दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
● वर्ष १६ वे ● अंक २७३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२८ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

कर्जत तालुक्यात धोत्रेवाडी येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार

दै.रायगड नगरी । कर्जत

घरात घुसून अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना कर्जत तालुक्यातील धोत्रेवाडी आंबिवली येथे घडली. हे काळे कृत्य करणार्या नराधमाला रविवारी (२६ डिसेंबर) रात्री अटक करण्यात आली आहे.

धोत्रे येथे पाच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.१६ वर्षीय पीडित मुलगी घरात एकटी असल्याचा गैरफायदा घेत, धोत्रेवाडी आंबिवली येथे राहणार्या या नराधमाने घरात प्रवेश केला. पीडित मुलगी घराच्या हॉलमध्ये झोपलेली असताना, तिला उचलून त्याने आतल्या खोलीत नेले आणि तिच्यावर लैंगिक हमला केला. तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले.पीडित मुलीच्या तक्रारीनंतर याप्रकरणी सदर नराधमाविरोधात कर्जत पोलीस ठाण्यात विनयभंग केल्याप्रकरणी भा.दं.वि.क. ३५४, ३५४(ल), ४५२, पोक्सो कायदा, २०१२ चे कलम ७, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला रविवारी (२६ डिसेंबर) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

सातारा येथे लोकनेते रामशेठ ठाकूर भवनाचे खा.शरद पवार यांच्या हस्ते उदघाटन

दै.रायगड नगरी । हरेश साठे

सातारा : थोर देणगीदार रामशेठ ठाकूर यांनी धनाचा उपयोग सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी करत रयतला भरभरून दिले आहे, त्यामुळे त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हि आमची जबाबदारी आहे, असे गौरवोद्गार रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी केंद्रीय कृषी मंत्री, खासदार शरदराव पवार यांनी आज (सोमवार, दि. २७) सातारा येथे केले.

तन, मन, धनाने शिक्षण क्षेत्राला सर्वस्व अर्पण करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अफाट कर्तुत्वाला सलाम करण्यासाठी सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या अद्ययावत सुविधायुक्त अशा 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' चे उदघाटन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी केंद्रीय कृषी मंत्री, खासदार शरदराव पवार यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात समारंभपूर्वक झाले. कर्मवीरांच्या भूमीत आजचा दिवस समस्त रायगडच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा होता, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या कर्तृत्वाने शिक्षण क्षेत्रात समाजसेवकाची भूमिका बजावली. आणि हा सोहळा डोळ्यात आणि हृदयात साठवून ठेवण्यासाठी राज्यातून विविध क्षेत्रातील मान्यवर, हितचिंतक उपस्थित होते. या समारंभपूर्वक हृद्य सोहळ्याने सर्वच जण भारावून गेले होते. संपूर्ण वातावरण प्रसन्नदायी झाला होता. त्यावेळी मनोगत व्यक्त करताना खासदार शरदराव पवार बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सिक्कीम राज्याचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, कार्याध्यक्ष ऍड. भगिरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव विठ्ठल शिवणकर, कायदेशीर सल्लागार ऍड. दिलावर मुल्ला, मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या मीनाताई जगधने, ऍड. रवींद्र पवार, राजेंद्र फाळके यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यास रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, ठाकूर कुटुंबीय त्याचबरोबर संस्थचे जनरल बॉडी सदस्य अरूणशेठ भगत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, तसेच पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक,नगरसेविका, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, आणि हितचिंतक आवर्जून उपस्थित होते.

पुढे बोलताना खासदार शरदराव पवार यांनी म्हंटले कि, ज्या भूमीत शिक्षण घेऊन मोठे कर्तृत्वान झाले त्या भूमीला रामशेठ ठाकूर विसरले नाही, त्यांच्या नावाने साताऱ्यात भवन उभारले आहे आज त्याचे उद्घाटन झाले, त्यामुळे आजचा दिवस रयत शिक्षण संस्थेच्या दृष्टिकोनातून महत्वाचा आणि आनंददायी दिवस असल्याचे सांगतानाच रामशेठ यांच्या कडून संस्थेच्या विकासासाठी कधीही नकार शब्द आला नाही, त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्या विकासात रामशेठ ठाकूर यांचा मोठा वाटा असल्याचा शरदराव पवार यांनी आवर्जून उल्लेख केला. संस्थेत जेव्हा कोणतेही प्रकल्प करायचा असेल त्यावेळी रामशेठ यांचे नाव येत नाही तो पर्यंत काम पूर्ण होत नाही असेही त्यांनी अधोरेखित केले. त्याचबरोबर रामशेठ ठाकूर रयतेचे खरे हितचिंतक आहेत असे त्यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितले. रायगड जिल्हा पुरोगामी विचारांचा जिल्हा म्हणून ओळखला जायचा. त्या जिल्ह्यामध्ये अनेक कर्तृत्वान लोकं पुढे आली. दि. बा. पाटील यांच्यासह अनेक सहकाऱ्यांचे नाव घेता येईल पण या सगळ्या सहकाऱ्यांमध्ये जोपर्यंत यात रामशेठ ठाकूर यांचे नाव येत नाही तो पर्यत ते पूर्ण होत नाही. ,असे शरदराव पवार यांनी म्हंटले. संस्थेच्या विकासात रामशेठ ठाकूर यांनी कधीही कसूर केला नाही वेळोवेळी मदत केली. रायगड, नवी मुंबई, त्याचबरोबरीने राज्यातील विद्यालयांना कोटीच्या कोटी रुपयांनी मदत केली आहे असे सांगतानाच शरदराव पवार यांनी मदतीची मोठी यादी वाचताना रामशेठ ठाकूर यांनी केलेली मदत म्हणजेच रयतला सर्वस्व अर्पण केले असल्याची प्रतिक्रिया देत रामशेठ ठाकूर यांचे योगदान अनन्य साधारण असल्याची पोचपावती दिली. कर्मवीर अण्णांनी शाहू, फुले, आंबेडकर, गाडगेमहाराज यांचे विचार मनात आत्मसात करून वाटचाल केली, त्याचप्रमाणे त्यांच्या आदर्शाचा वारसा पुढे चालविण्याचे काम होत आहे. व्यक्तिमत्व घडविण्यासाठी निष्ठा, नाते, बांधिलकी लागते, आणि त्यातूनच समाजाप्रती भावना निर्माण होतात, रामशेठ ठाकूर यांनी सामाजिक बांधिलकी जपत मोठ्या उदार मनाने कार्य केले आहे, त्यामुळे संस्थेच्या प्रत्येक जडणघडणीत रामशेठ यांचा सहभाग महत्वाचा आहे असे सांगतानाच रामशेठ आणि मी रयतच्या विकासासाठी काम करीत राहू, असेही त्यांनी आपल्या भाषणात सांगताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संस्थेच्या उभारणीत आणि यशात मोठे योगदान असल्याचे प्रांजल कबुली दिली.

'राम' चा रामशेठ रयतमुळे : लोकनेते रामशेठ ठाकूर

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद हे ज्यांनी आत्मसात केले तो व्यक्ती मोठा झाला आहे. रयत शिक्षण संस्था माझे घर आहे. कर्मवीर अण्णांची कृपादृष्टी झाली नसती तर आम्ही सुशिक्षित झालो नसतो. आम्हाला पैलू पाडण्याचे काम अण्णांनी केले आहे, त्यामुळे 'राम' चा रामशेठ रयतमुळे झाला आहे. पवारसाहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही रयत शिक्षण संस्थेत काम करीत आहोत याचा आम्हाला अभिमान आहे, त्यांचे सातत्याने संस्थेला मार्गदर्शन लाभते. मी त्यांच्या सोबत राजकारणात गेलो नाही पण त्यांचा शिक्षण क्षेत्राचा आदर्श घेऊन वाटचाल केली. अण्णांचा आशीर्वाद आणि पवारसाहेबांची साथ यामुळे शिक्षण क्षेत्रात वाटचाल सुरु आहे. अण्णांच्या आपुलकीने विशेष संस्कार घडले. त्यामुळे आपल्याकडे असलेला काहीतरी भाग समाजासाठी द्यावा, हि कायम ईच्छा असते, त्यामुळे रयत शिक्षण संस्थेचे ऋण फेडू तेवढे कमी आहेत. आजचा समारंभ माझ्या आयुष्यातील मोजक्या पाच दहा समारंभापैकी एक आहे. रयतेचे आपल्यावर अफाट उपकार आहेत, त्यामुळे संस्थेच्या विकासासाठी यापुढेही आपले सहकार्य राहील.

रयत शिक्षण संस्थेच्या कुंभोज येथील विद्यालयाच्या विकासासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ०१ कोटी २५ लाख रुपये व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी ०१ कोटी २५ लाख रुपयांची देणगी जाहीर केली होती ती या सोहळ्यात धनादेशाद्वारे संस्थेचे अध्यक्ष शरदराव पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. यावेळी संस्थेच्यावतीने लोकनेते रामशेठ ठाकूर व शकुंतला ठाकूर यांचा हृद्य सत्कार करण्यात आला.

पनवेल शहरातील मध्यवर्ती वाहतूक शाखेचे कर्मचारी मोरे म्हणतात मी अनोळखी नंबर उचलत नाही

परंतु त्याच शाखेत दंडाची भीती दाखवून पाठविलेल्या प्रायव्हेट टीमकडुन २०० रोख घेतले जातात तेच फोन तुम्ही घेता का?

दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार

पनवेल : नवीमुंबई आयुक्तालयातील वाहतुक शाखेचे काही कर्मचारी अधिकारी वर्गाला अंधारात ठेवुन ई चलनाच्या माध्यमातुन मोठ्या रकमेचा दंडाचा धाक दाखवून तोड पाणी करून सर्व सामान्य नागरीकांचे जीणे मुश्किल करून हैराण केले जात आहे, असा आरोप नागरिकांमधून केला जात आहे.

नुकताच वाशी टोल नाक्यावर एक ईको चालक मुंबई वरून रायगड कडे येत असता वाहतुक पोलीसांनी त्याची गाडी अडविली. इको चालकाने आपल्या ताब्यातील गाडी साईडला लावुन काय झाले? असे विचारले तेव्हा वाहतूक पोलीसांनी त्या वाहनचालकाकडे लायसन्सची मागणी केली. सदर वाहन चालकाने सोबत असलेले लायसन्स वाहतुक पोलीसांना नम्रपणे दाखविले. आता लायसन्स पाहुन पोलीस सोडतील असा गोड गैरसमज त्या ईको चालकाचा झाला. परंतु ती गाडी न सोडताच वाहतुक पोलीसांनी दुसरी मागणी ईको चालकाकडे गाडीच्या पेपर्सची केली. तेव्हा वाहनचालकाने गाडीचे पेपर्स डीकीतुन काढुन वाशी वाहतुक पोलीसांना दाखविले. ते पाहिल्यावर वाहतुक पोलीसांनी ईको चालकाकडे पी.यु.सी.मागणी केली ती ही बरोबर योग्य व कायदेशीरीत्या योग्य असल्याचे पाहुन वाशी वाहतुक पोलीसांनी गाडी आतुन चेक करण्यास सुरुवात केली व आपण आपल्या ईको गाडीत सीटमध्ये बदल केला आहे, आपणास मोठा दंड बसु शकतो हे बोलुन वाहतुक पोलीसांनी चक्क ५०० रूपयाची मागणी करून तुला सोडतो आधीच दमलेला व चौकशीला त्रस्त झालेला ईको चालक चालकाने ५०० रूपये देऊन आपली सुटका करून घेतली, अशा स्वरूपाच्या पिळणुकीच्या घटना रिक्षा चालक, ईको चालक, ट्रान्स्पोर्ट ड्रायव्हर तसेच हजारो सर्व सामान्य नागरीकांना या वाहतुक विभागातील काही कर्मचारी यांच्याकडुन अक्षरशः पिळले जात असल्याचा आरोप नागरीकांतुन होत आहे.

पनवेल शहरातील ओरीयन मॉल ते विजय सेल्स, पनवेल उरण नाका, पंचमुखी मारूती येथील वाहतुक पोलीस चौकी तसेच पळस्पा येथील वाहतुक चौकी कळंबोली सर्कल, कर्नाळा स्पोर्टस्, टी.पॉईन्ट, या आणि अशा विविध ठिकाणी वाहतुक पोलीस ई चलनाचा धाक दाखवुन तसेच टोचन लावून सर्व सामान्य नागरीकांकडुन जोरदार वसुली मोहीम राबवित असल्याचे बोलले जात आहे.

नुकताच एक प्रकार ओरीयन मॉल जवळ घडला आहे. ओरीयन मॉल जवळ एक प्रायव्हेट इसम टोचनचा हूक घेऊन सावज शोधत असतो. कालच एका महिला वाहन चालकाच्या गाडीला सदर इसमाने गाडीच्या पुढील चाकाला लॉक लावुन तो दुसरी गाडी शोधायला गेला असता सदर महिला वाहन चालक तेवढ्यात आल्या व गाडीला हुक लॉक लावलेला पाहुन सदर प्रायव्हेट ईसमाला म्हणाल्या की हे काय त्यावर तो ईसम म्हणाला की आपण पनवेल शिवाजी पुतळा येथील पोलीस चौकीत जाऊन दंडाची रक्कम भरून पावती आणा मी गाडीला लावलेला हुक लॉक काढतो. संबधीत महिला यांना सदर पोलीस चौकी कुठे आहे माहित देखील नव्हते. त्यांनी रिक्षा केली व त्या महिला चौकीत गेल्या व आपला चार चाकी गाडी नंबर सांगितला आधीच हूक लॉक लावलेल्या प्रायव्हेट व्यक्तीने सदर गाडीचा चौकीत बसलेल्या इसमास त्या गाडीचा फोटो वॉटसप केला होता. चौकीत आलेल्या महिलांकडुन चक्क २०० रोख घेऊन एक कागद देण्यात आला. त्या कागदावर एक नंबर होता तो ओरीयन मॉल जवळील प्रायव्हेट व्यक्तीला देण्यात आला. त्यानंतर सदर व्यक्तीने गाडीला लावलेला हुकलॉक काढुन ती व्यक्ती पुढील सावज शोधण्याच्या मार्गी लागली अशा प्रकारे पनवेल परिसरात वाहतुक विभागाकडुन नागरीकांना जेरीस आणण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. शहरातील वाहतुक कोंडी कडे वाहतुक पोलींसांचे दुर्लक्ष होत आहे. पनवेल शहरात अनेक ठिकाणी गल्ली बोळात अनेक महीने चारचाकी गाड्या धुळ खात पडल्या आहेत ज्यामुळे शहरातील वाहतुक कोंडी वाढत आहे. त्या गाड्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष वाहतुक पोलीस करीत आहेत. या बाबत कर्तव्यदक्ष पोलीस आयुक्त यांनी वेळीच लक्ष घालुन वाशी टोल नाका ते पनवेल पळस्पा हद्दी पर्यंत चाललेला ई चलनाच्या धाक मोहिमेला लगाम घालावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

नुकताच पेण रामवाडी येथील पोलीस चौकीत एका बस चालकाकडुन ई चलनाचा धाक दाखवुन दोन वाहतुक पोलीसांनी रोख रक्कम उकळुन ती रक्कम कमी पडल्याने नंतर बसचा फोटो काढुन ई चलनाची कारवाई केली व बस मालकाच्या मोबाईल वर वाहतुक शाखेच्या दंडाची रक्कम राञी बारा वाजता आल्याने मालक व संघटनेच्या पदाधिकारी यांनी दोन वाहतुक पोलीसांची घटनास्थळाची मोबाईलवर शूटींग काढुन ती व्हायरल झाल्याने पोलीस अधिक्षक रायगड यांनी सदर त्या दोन वाहतूक पोलीसांची उचलबांगडी करून त्यांची तात्काळ म्हसळा येथे तडकाफडकी बदली करण्यात आल्याचे ताजेच उदाहरण असल्याचे नागरीकांतुन बोलले जात आहे.

जमिनीच्या वादातून सख्ख्या भावानेच केली भावाची गोळ्या झाडून हत्या

दै.रायगड नगरी । पेण

पेण तालुक्यातील हनुमानपाडा येथील सख्या भावानेच आपल्या सख्या भावाची जमिनीच्या वादातून घराच्या अंगणात हत्या केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात राम हरिभाऊ पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. फरार खुनी भावाला दादर सागरी पोलिसांनी काही तासातच पनवेल येथून अटक केली.

सविस्तर घटना अशी की, फिर्यादी संतोष राम पाटील (वय ४०) रा.हनुमानपाडा यांचे वडील राम हरिभाऊ पाटील व काका पांडुरंग हरिभाऊ पाटील रा.हनुमानपाडा यांच्यात गेल्या काही वर्षांपासून वडिलोपार्जित जमिनीच्या गुरांच्या वाड्याच्या वाटपावरून वाद चालू होता. रविवार २६ डिसेंबर रोजी परेश पांडुरंग पाटील व राम हरिभाऊ पाटील यांची पत्नी प्रभावती व मुलगा संतोष यांच्यामध्ये घरासमोर वाद झाला. सदर वाद मिटल्यानंतर संतोष पाटील व त्याची आई प्रभावती पाटील हे दोघे त्याबाबत तक्रार देण्यास दादर सागरी पोलीस ठाण्यात आले असल्याचे पाहून पांडुरंग हरीभाऊ पाटील, परेश पांडुरंग पाटील व शैला पांडुरंग पाटील (सर्व राहणार हनुमानपाडा) हे फिर्यादी संतोष राम पाटील यांच्या घराच्या अंगणात जाऊन त्यांनी राम पाटील यांना शिवीगाळ करून पांडुरंग हरीभाऊ पाटील याने त्याच्याजवळ असणारी बारा बोर बंदुकीतून राम पाटील यांच्या छाती व पोटाच्या खाली गोळ्या झाडल्या. त्यात राम हरिभाऊ पाटील यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर घटनेची माहिती मिळताच रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसपी विभा चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली आणि या घटनेच्या तापसाबाबत सूचना दिल्या. त्यानुसार दादर सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक भउड, भुसाने, पोलीस हवालदार मुंडे, कोकरे,

.../२

आंबेगाव नजीक भीषण अपघात ; १ ठार १ गंभीर

दै.रायगड नगरी । पेण

पेण खोपोली राज्यमार्गावर भरधाव असणाऱ्या कारने समोरून येणाऱ्या मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकल वरील अनंत कृष्णा दिवेकर यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर अपघाताचे सविस्तर वृत्त असे की, पेण खोपोली राज्यमार्गावर करोटी वरसईहुन पेणच्या दिशेने येणाऱ्या MH 06 V 8309 क्रमांच्या स्कुटी पेप मोटारसायकलला पेणहुन खोपोलोच्या दिशेने जाणाऱ्या MH 06 CC 2929 क्रमांकाच्या हॅरीअर कारने समोरून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात मोटारसायकलवरील अनंत कृष्णा दिवेकर वय ६७ राहणार करोटी, वरसई ता.पेण यांचा जागीच मृत्यू झाला तर हरिभाऊ कृष्णा दिवेकर वय ६० राहणार करोटी, वरसई ता.पेण हे गंभीर जखमी आहेत. सदर अपघाताची माहिती मिळताच अपघातग्रस्तांचे वाली कल्पेश ठाकूर यांनी रुग्णवाहिकेतून अपघातग्रस्तांना पेण उपजिल्हा रुग्णालयात अधिक उपचारासाठी दाखल केले. पेण पोलीस स्टेशन मध्ये अपघाताची नोंद झाली असून पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

लांबत चाललेली लढाई

करोनाला पराभूत करू आणि पुन्हा नव्याने डाव मांडू; अशा समजुतीत केवळ भारतच नव्हे तर सारे जग होते. ही समजूत चूक असल्याचे युरोप, कॅनडा, जपान, अमेरिका या देशांसहित जगातील वास्तव सांगते आहे. त्यामुळे, काळजी घेऊन, करोनाला नियंत्रणात ठेवून, निर्बंध पाळून आणि आरोग्यसेवा भक्कम बनवून हा विषाणू असतानाही वाट चालत राहायला हवी, हे नवे शहाणपण आता जगात दिसते आहे. भारतालाही तेच शिकावे लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी अचानक केलेले भाषण आणि महाराष्ट्रात रात्री नऊ ते सकाळी सहा या काळात नव्याने लागू झालेले निर्बंध यांचा तोच अर्थ आहे. भारतातच नव्हे तर साऱ्या जगात कठोर निर्बंध असताना निपचित पडलेले समाजजीवन आणि निर्बंध थोडे शिथिल होताच उसळून बाहेर पडणारी ऊर्जा; हे चित्र वारंवार दिसले. ही दोन्ही चित्रे योग्य आणि हिताची नाहीत; हेच डेल्टा असो की ओमायक्रॉनसहित विविध अवतार धारण करून करोना सांगतो आहे. जागतिक आरोग्य संघटनेला (डब्लूएचओ) सन २०२२ हे करोनाच्या थैमानाचे अखेरचे वर्ष असेल; असे वाटत होते. ओमायक्रॉन ज्या वेगाने पसरतो आहे, तो वेग पाहता आरोग्य संघटनेने हा अंदाज मागे घेतला आहे. तो मागे घेणे, याचा अर्थ जगाचे अर्थकारण आणि लोकजीवन अजून किमान दीड ते दोन वर्षे करोनाच्या कमी-जास्त पण थेट प्रभावाखाली राहणार, असा आहे. जग एकूण करोनापूर्व स्थितीत येणे, ही तर पुष्कळच दूरची बाब आहे. ही दीर्घ पल्ल्याची लढाई असल्याचे संकेत पंतप्रधान मोदी यांच्या शनिवारच्या भाषणातून स्पष्टपणे मिळाले. आजवर 'बूस्टर' या तिसऱ्या लसमात्रेविषयी अधिकृतपणे काही बोलले जात नव्हते. आता मात्र, मोदींनी आरोग्य सेवेतील कर्मचारी तसेच साठी उलटलेल्या ज्येष्ठांना डॉक्टरांच्या सल्ल्याने तिसरा डोस देण्याची घोषणा केली आहे. याशिवाय, पंतप्रधानांनी तीन जानेवारीपासून १५ ते १८ या वयोगटातील मुलामुलींना डोस देण्याचे घोषित केले. हा वयोगट येत्या काही आठवड्यांत आणखी खाली येईल. आज देशात दोन्ही लसमात्रा मिळून १४१ कोटी डोस देण्यात आले आहेत. आता तिसरा प्रतिप्रेरक-बूस्टर डोस आणि लहान मुलांचे लसीकरण यांचा हिशेब मांडला तर एकूण लसमात्रांचे गणित ४२० कोटी मात्रांच्या पुढे जाते. लवकरच सुरू होणाऱ्या नव्या वर्षात लसीकरणाचे किती प्रचंड मोठे आव्हान केंद्र तसेच राज्य सरकारांच्या पुढे उभे आहे, हे यातून स्पष्ट व्हावे. लसीकरण जितक्या वेगाने आणि प्रामाणिकपणे पुरे होईल; तितका करोनाच्या उत्तरोत्तर येणाऱ्या लाटांचा तडाखा कमी होऊ शकेल. अर्थात, वारंवार आपली रचना बदलणारा विषाणू आणि नव्या शक्तिशाली लसी बनवून त्याला कह्यात ठेवू पाहणारी मानवजात हा जीवघेणा लपंडाव बराच काळ चालेल, असे दिसते. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रात लग्नसमारंभ, जाहीर कार्यक्रम, उत्सव, क्रीडा स्पर्धा यांच्यासहित बहुतेक सार्वजनिक कार्यक्रमांवर नवे निर्बंध आले आहेत. या नव्या निर्बंधांमुळे गेले काही महिने थोड्याशा सुरळीत झालेल्या समाजजीवनाला नव्याने ब्रेक लागेल. महाराष्ट्रातील सर्व लहान-मोठ्या शहरांमध्ये लोकसंख्येची घनता नियोजनशून्य वाढीमुळे अनावर वाढली आहे. त्यामुळे, निर्बंध आले की, सारे लोकजीवन घुसमटून जाते. प्रत्यक्षात, नियम आणि निर्बंध पाळून व्यवहार करण्याची शिस्त लावून घेण्याची आवश्यकता आहे. हा धडा आपण पहिल्या व दुसऱ्या लाटेतही पूर्णपणे शिकलेलो नाही. त्यामुळेच, आजही सार्वजनिक ठिकाणी मुखपट्टी न लावलेले, स्वच्छता न पाळणारे अनेक नागरिक दिसतात. जाहीर कार्यक्रम, नाट्यप्रयोग किंवा चित्रपटांचे खेळ नवी बंधने व अंतर पाळून कसे करता येतील, याचे आर्थिक गणित नव्याने बसवावे लागणार आहे. तसेच, दुबार भरणाऱ्या शाळांनाही तोडगा काढावा लागेल. शिक्षण थांबवायचे नाही आणि मुलेही कायमची घरात कोंडून पडणार नाहीत, यासाठी कल्पक प्रयोग करण्याची गरज आहे. भारतात सदैव कुठे ना कुठे निवडणुका चालू असतात. लग्ने होत असतात. सध्या महाराष्ट्रात बडे आणि छोटे असे शेकडो विवाह रोज होत आहेत. तेथे कोणतेही नियम पाळले जात नाहीत. याबाबत स्वत: पंतप्रधानांनी आपल्या सभांचे नियोजन करून आदर्श घालून द्यायला हवा. नवी प्रचाररीत रुजवायला हवी. इतक्या आव्हानात्मक परिस्थितीतही नेत्यांनी आपल्या घरातील लग्ने साधेपणाने करू नयेत, हे लांच्छनास्पद आहे. करोनाला घाबरायचे नाही, याचा अर्थ बेछूट वागायचे, असा नाही. अर्थकारण आणि लोकव्यवहार येत्या काळात पूर्ण बंद पडायचे नसतील तर मुखपट्टी, स्वच्छता, शारीर अंतर आणि लसमात्रा ही आयुधे जवळ लागतील. त्यांच्या सोबतीने आपण करोनाला कह्यात ठेवू आणि पुढे जात राहू.

वाहतूक कोंडी आणि तालुक्यातील इतर समस्यांबाबत तहसिलदारांची विविध अधिकाऱ्यांसोबत बैठक

दै.रायगड नगरी । उरण

वाहतूक कोंडी आणि तालुक्यातील इतर समस्यांबाबत तहसिलदारांची विविध अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन समस्या तातडीने सोडविण्याचे निर्देश दिले आहेत. रायगड जिल्हा इंटकच्या वतीने उरण तालुक्यातील वाहतूक कोंडी आणि त्यातून होणारे अपघात आणि इतर समस्या सोडविण्यासाठी तहसिलदारांना निवेदन देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी विविध आस्थापनांच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते.

उरण तालुक्यात वाहतूकीचे प्रमाण जास्त असल्याने आणि या भागात गोदामे आणि कंटेनर यार्ड मोठ्या प्रमाणात असल्याने तालुक्यातील अनेक रस्त्यांवर ही वाहने अनधिकृतपणे उभी केली जातात.

या अनधिकृत पार्कींगमुळे वाहतूक कोंडी होवून अनेक अपघात होतात त्यावर कडक उपाय योजना करावी अशी मागणी इंटकच्या वतीने करण्यात आली होती. त्या बाबत उरणचे तहसिलदार उरण तालुक्यातील वाहतूक पोलिसांना सुचना देवून रस्त्यावरची पार्कींग बंद करण्यासाठी उपाय योजना करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच या बैठकीत एनएमएमटी सेवा, कमकुवत सिडको कार्यालयाजवळील पुलावर हाईट बॅरिकेट लावणे इत्यादी उरणच्या समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, उरणचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक सुनिल पाटील, उरण वाहतूक विभागाचे पोलिस निरिक्षक अशोक गायकवाड, न्हावाशेवा वाहतूक विभागाचे पोलिस निरिक्षक निरज चौधरी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता नरेश पवार, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष जे.डी. जोशी, शहर अध्यक्ष किरिट पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद म्हात्रे, काँग्रेसचे मच्छिमार सेलचे मार्तंड नाखवा आदी उपस्थित होते.

कर्जत शिरसे येथे वणवे लागू लागले पण वन विभागाचे दुर्लक्ष

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत तालुक्यात नेहमीप्रमाणे वणवे लागू लागले असून हे वणवे मानवनिर्मित कि नैसर्गिक आहेत याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.परंतु सगुणा वन संवर्धन टीमकडे योग्य नियोजन नेरळ भागात वणव्यांवर सुरु असताना कर्जत भागात वणवे रोखण्यासाठी वन विभाग सक्रिय नसल्याचे दिसून येत असून रविवारी कर्जत जवळील शिरसे टेकडी वानवा लागल्याने जाळून खाक झाली.दरम्यान,तीन तास हा वानवा भडकत असताना वन विभागाला स्थानिकांनी फोनद्वारे माहिती देऊन देखील वन कमर्चारी तेथे पोहचले नाहीत.

कर्जत तालुक्यात कृषिरत्न शेखर भडसावळे यांच्या माध्यमातून सगुणा वन संवर्धन टीमकडून वणवे रोखण्यासाठी गेली सहा वर्षांपासून काम सुरु आहे.सगुणा वन संवर्धन टीमने केलेल्या नियोजन बद्ध कामामुळे नेरळ भागात तसेच माथेरानच्या जंगलात वणवे रोखण्यात यश आले आहे.मात्र कर्जत तालुक्यातील अन्य भागात वणवे रोखण्यात वन विभागाला अपयश आल्याचे दिसून येत आहे. नेरळ आणि माथेरान भागातील वन रोखण्याच्या कामात सगुणा वन संवर्धन टीम ला वन विभागाचे साहाय्य लाभत आहे.

मात्र हा प्रयोग वन विभाग अन्य भागात राबवत नसल्याने वणवे लागण्याचे सुरु झाले आहे. त्यात लागणारे वणवे हे मानवनिर्मित आहेत कि नैसर्गिक हा विषय बाजूला असून वन विभागाने वणवे रोखण्यासाठी कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्याने वणवे सतत लागत आहेत.सरता पाऊस लांबल्याने आणि नंतर यावेळी पावसाने आता गवत सुकण्यास सुरुवात झाली असून लागलीच वणवे लागण्यास सुरुवात झाली आहे.

कर्जत तालुक्यातील कर्जत- वासरे परिसरातील दोन टेकड्या या वणव्याच्या भक्ष्यस्थानी पडल्या असून आकुर्ले येथील टेकडी नंतर शिरसे येथील टेकडी रविवारी २६ डिसेंबर रोजी वणव्याने काळी झाली आहे.रविवारी लागलेला हा वानवा सायंकाळी साडेसहा सात वाजता लागला होता आणि त्यानंतर तब्बल तीन तास तेथील डोंगर जळत होता. त्या काळात येथील स्थानिक तरुणांनी वन विभागाला फोनद्वारे लागलेल्या वणव्याबद्दल माहिती दिली,परंतु संपूर्ण टेकडी आगीच्या भक्ष्यस्थानी आली तरी वन कर्मचारी तेथे पोहचले नव्हते. त्यात ती टेकडी वनविभागाच्या मालकीची असून गेल्या काही वर्षात तेथे सातत्याने वृक्षारोपण वन विभाग करीत असते आणि अशा ठिकाणी जाळरेषा काढून वणवे रोखण्याचे काम वन विभागाने केले नाही आणि त्यामुळे गवताबरोबर तेथील झाडे देखील आगीच्या भक्ष्यस्थानी आली आहेत.

मात्र त्या भागातील आकुर्ले येथील टेकडी वणव्याने जळल्यानंतर दुसऱ्या दिवशी तेथून एक किलोमीटर आत असलेल्या शिरसे टेकडीला वणवा लागतो. ती बाब काहीशी संशय निर्माण करणारी असून वन विभागाच्या दुर्लक्षपणामुळे शिरसे टेकडी आगीच्या भक्षस्थानी आली आहे.

उलवे मधील आरक्षित गार्डन प्लॉट घेणार मोकळा श्वास

दै.रायगड नगरी । पनवेल

२९ डिसेंबर २०२१ रोजी शेतकरी कामगार पक्षाचे आमदार बाळाराम पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकरी कामगार पक्ष उलवे आणि विरोधी पक्षनेते प्रितम म्ह-ात्रे यांच्या जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून उलवे नोड २ येथे स्वच्छता मोहिमेचे नियोजन २६ डिसेंबर रोजी सेक्टर १७ उलवे येथे करण्यात आले होते.

उलवे नोड २ मधील बरेचसे गार्डन प्लॉट हे अतिक्रमण आणि डेव्हलप न झाल्यामुळे नागरिकांना वापरात येत नव्हते. सदर आरक्षित प्लॉटवरील स्वच्छतेची जबाबदारी शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून करण्याचा निर्धार विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी काही दिवसांपूर्वी व्यक्त केला होता आणि त्याचाच एक भाग म्हणून आमदार बाळाराम पाटील साहेबांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्व नागरिकांच्या सहभागातून स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी कामगार पक्ष कार्यालय सेक्टर १७ उलवे येथील कार्यालयाच्या ठिकाणी सकाळी नऊ वाजता सदर मोहिमेचा शुभारंभ झाला. याप्रसंगी राजेंद्र घरत (उपाध्यक्ष, भात गिरणी पनवेल) सचिन राजे येरुणकर, रोहन खंडू, संदीप पाटील, निलेश पाटील, किशोर कदम, मंगेश सावंत, प्रकाश सुर्वे, संकेत जाधव, चव्हाण, विनोद थोरात, विलास चदेल, सुरेश फाटक, सुरज देवकर, विशाल देवकर, योगेश बावकर, अमित जस्वाल, प्रथमेश पास्ते व इतर स्थानिक नागरिक उपस्थित होते. उलवे नोड २ मध्ये नव्याने निर्माण झालेल्या वसाहतीमध्ये सिडकोच्या माध्यमातून अजूनही काही सेवा अपुऱ्या आहेत त्या सेवा मिळवून देण्यासाठी आज पर्यंत शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांचे नेहमीच सहकार्य मिळत आले आणि गार्डन प्लॉट स्वच्छ करून नागरिकांना खुले करून देण्याच्या या स्तुत्य उपक्रमा बद्दल उपस्थित ज्येष्ठ नागरिक आणि महिला वर्गातून आभार मानण्यात आले

मुंबई- गोवा महामार्गाच्या रुंदीकरणाने शेतकऱ्यांना लावले भिकेला

दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे

माणगाव: मुंबई-गोवा महामार्गाचे ड्रीम प्रोजेक्ट हे कोकणचे कॅलिफोर्निया करण्याचे स्वप्न शासनाचे आणि नेत्यांचे दहा ते बारा वर्ष उलटून गेली तरी धूळखात पडलेले आहे. त्यातच शासनाने शेतकऱ्यांच्या दुपिकी जमिनी नोटिसा काढून घेण्यात आल्या, त्या नोटिसा च्या आदेशामध्ये स्पष्टपणे उल्लेख करण्यात आलेला आहे की दोन महिन्यांमध्ये जमिनीची संमती देण्यात यावी अन्यथा शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या संमतीशिवाय संपादित केल्या जातील त्या भीतीपोटी शेतकऱ्यांनी आपल्या लाखमोलाच्या जमिनी शासनाच्या हवाली केल्या परंतु गेली १२ ते १५ महिने होऊन सुद्धा शेतकऱ्यांना त्या जमिनींचा मोबदला अजून पर्यंत देण्यात आलेला नाही, दररोज प्रांत कार्यालयात खेटे मारून शेतकऱ्यांच्या पायातील चपलांचे जोडे झिजून गेले आहेत शासनाचे शासकीय सॉफ्टवेअर गेले बारा ते पंधरा महिन्यांपासून बंद असल्याचे सांगण्यात येत आहे. गेल्या सप्टेंबर महिन्यापासून या संगणकीय प्रणाली वरती काम सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे त्यातच केंद्र शासनाने फतवा काढून शेतकऱ्यांचा जागे संबंधीचा असलेला मोबदला थांबवण्यासाठी आदेश देण्यात आले. शेतकऱ्यांना आपल्या घेण्यात आलेल्या जागेच्या मोबदल्या यासंदर्भात आता चिंता वाटू लागली आहे. केंद्र

शासनाच्या या आदेशामुळे शेतकरी पूर्णता आता गलितगात्र झालेला आहे, त्यांना आता आपल्या जागा सुद्धा जातील आणि त्याचा मोबदला सुद्धा मिळणार नाही अशी शेतकऱ्याकडून चिंता व्यक्त केली जात आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेल्या दहा ते बारा वर्षापासून पूर्ण करण्याचे धोरण पार कोलमडून पडलेले आहे.

मुंबई-गोवा महामार्गानंतर होऊ घातलेला शासनाचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणजे समृद्धी महामार्ग या महामार्गाचे काम गेल्या तीन वर्षात ८० टक्के पर्यंत पूर्ण झालेले असताना मुंबई-गोवा महामार्गाचे ग्रहण काही संपत नाही, याला कारणही तसेच कोकणातील राजकारण हे जनतेसाठी नसून स्वार्थासाठी याचा वापर केला जातो त्यामुळे या प्रोजेक्टसाठी आणि शेतकऱ्यांसाठी कोणीही पुढाकार घेण्यास तयार होत नाही, त्यामुळे शेतकरी हा एकटा पडलेला दिसतोय. महामार्गाचा मोबदला मिळत नसल्यामुळे दररोज शेकडो शेतकरी हे माणगावच्या कार्यालयात विचारपूस करण्यासाठी येत असल्यामुळे तेथील अधिकारी आणि कर्मचारी यांना सुद्धा शेतकऱ्यांना उत्तरे देता देता नाकीनऊ येत आहेत. माणगाव कर्तव्यदक्ष प्रांताधिकारी प्रशाली दिघावकर जाधव यांनासुद्धा शेतकऱ्यांच्या या परिस्थितीची जाणीव असल्याकारणाने त्यासुद्धा शेतकऱ्यांना लवकरात लवकर त्यांच्या जागेचा मोबदला मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असतील अशी अपेक्षा बाळगण्यास काहीच हरकत नाही.

पृष्ठ क्र.१ वरुन...

जमिनीच्या वादातून सख्ख्या भावानेच केली भावाची गोळ्या झाडून हत्या

जाधव, पाटील यांनी सदर गुन्ह्यातील फरार झालेल्या आरोपींच्या शोधासाठी पथक तयार करून यातील महिला आरोपी शैला पांडुरंग पाटील हिला ताब्यात घेऊन तिची सखोल चौकशी केली असता तिने फरार आरोपी पती व मुलगा हे पनवेल येथे गेले असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे तिच्या माहितीवरून सदर पथक पनवेल येथे जाऊन शिताफीने पांडुरंग पाटील व परेश पाटील यांना काही तासातच ताब्यात घेऊन अटक करण्यात आले आहे. दादर सागरी पोलीस ठाण्यात भा. दं.वि. कलम ३०२/३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३ /२५/२७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साळाव-मुरुड रस्त्याच्या कामाला मुहूर्त कधी मिळणार ? नागरिकांचा सवाल

रस्त्याच्या दुतर्फा झुडपांचा विळखा तर अनेक ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य

दै.रायगड नगरी । कोर्लई

पावसाळा उलटून दोन महिने झाले तरी अद्यापही कामाला सुरुवात न झाल्याने अखेर साळाव-मुरुड रस्त्याच्या कामाला मुहूर्त कधी मिळणार ?असा सवाल नागरिक, प्रवासी व वाहनचालकांकडून विचारला जात आहे.

खड्ड्यांच्या त्रासानंतर गेल्या अनेक दिवसांपासून साळाव - मुरुड रस्त्यावर अनेक ठिकाणी असलेल्या झाडाझुडुपांचा विळखा तसेच काही ठिकाणी खाली आलेल्या झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत असून विहूर,मोरे ते मजगांव, उसरोली फाटा, नांदगाव बाजार ते बाजारपेठ,वाघेश्वर नगर,दांडा,सर्वे, काशिद, काशिद यु-टर्न,बारशिव,बोर्ली स्टँड,कोर्लई भागात रस्त्यावर खड्ड्यांमुळे प्रवासी व वाहनचालक यांना त्रास व हाल सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षा बाबत नाराजीचा सूर दिसून येत असून रस्त्याच्या साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी केली जात आहे तसेच काही ठिकाणी रस्त्यावर झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत आहे.मुरुड -जंजिरा किल्ला, काशिद बीच पर्यटनात याठिकाणी पर्यटकांची रेलचेल असून नववर्षाच्या स्वागतासाठी आतापासूनच समुद्र किनारे फुलले आहे तर शनिवार रविवार रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा असून वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅम ला सामोरे जावे लागते आहे. पावसाळा उलटून दोन महिने झाले तरी अद्यापही कामाला सुरुवात न झाल्याने अखेर साळाव-मुरुड रस्त्याच्या कामाला मुहूर्त कधी मिळणार ? असा सवाल नागरिक प्रवासी व वाहनचालकांकडून विचारला जात आहे.

पहूर ग्रा.प. पोटनिवडणूक शिवसेनेच्या ऐश्वर्या शिंदे विजयी

दै.रायगड नगरी । रोहा

रोहा तालुक्यातील पहुर ग्रामपंचायत येथील एक सदस्यपद रीक्त झाल्याने या जागेसाठी निवडणूक घेण्यात आली. यामध्ये शिवसेनेच्या उमेदवार ऐश्वर्या यशवंत शिंदे यानिवडून आल्या आहेत.

पहुर ग्रामपंचायत मध्ये हे यश संपादन करण्यासाठी रमेश धनावडे, राजेंद्र यादव, शाखा प्रमुख महेश शिंदे आदी शिवसैनिकांसह उपतालुका प्रमुखं चंद्रकांत लोखंडे, शिवसेना विभागप्रमूख कुलदीप सुतार यांनी खूप मेहनत घेतली.

त्याबद्दल शिवसेना रोहा तालुका प्रमुख समीर शेडगे यांनी या विजयी उमेदवारांचे तसेच त्यांना निवडून आणण्यासाठी अथक परिश्रम केलेल्या शिवसैनिकांचे कौतुक केले. त्याचप्रमाणे विजयी उमेदवार ऐश्वर्या यशवंत शिंदे यांचे सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषद व रोहा नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी विरोधात असेच घवघवीत यश संपादन करू असे आवाहन त्यांनी केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक: **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

म्हाडाची रूम मिळवून देण्याचे आमिष दाखवून आठ लाख तीस हजारांची फसवणूक

दै.रायगड नगरी । पनवेल

म्हाडाची रूम मिळवून देतो असे सांगून तब्बल ८ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार खारघरमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ओवे गाव, खारघर येथे राहणाऱ्या ३१ वर्षीय शीखा विमलचंद्र शर्मा नवीन रूमच्या शोधात होते. यावेळी तेजस्विनी वानखेडे हिने तिचे वडील संजय वानखडे हे म्हाडामध्ये मटेरियल सप्लायर असून त्यांची मंत्रालय व म्हाडामध्ये वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत ओळख असल्याचे सांगितले. व ते म्हाडाची रूम मिळवून देतील असे शिखा यांच्या वडिलांना सांगितले. त्यानुसार विमलचंद्र शर्मा यांनी संजय वानखडे यांच्याशी संपर्क केला. व रूम मिळवून देण्यासाठी सुरुवातीला आठ लाख ३० हजार रुपये भरावे लागतील असे सांगितले. त्यानंतर आठ लाख ३० हजार रुपये संजय वानखेडे यांना देण्यात आले. मात्र डिसेंबर २०१८ पर्यंत वानखेडे यांनी रूम मिळवून दिली नाही. व पैसे परत केले नाही. त्यानंतर वानखेडे यांच्याकडे रूम द्या किंवा पैसे परत मागण्यात आले. मात्र आज-उद्या करत वेळकाढूपणा करण्यात आल्याने वडिलांची फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर संजय वानखेडे व तेजस्विनी वानखेडे यांना फोन केला असता त्यांनी दोन चेक दिले. मात्र ते बाऊन्स झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संजय वानखेडे व त्यांची मुलगी तेजस्विनी वानखेडे यांच्याविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कौशिक ठाकूर यांचा राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत रायगड जिल्ह्यात दुसरा क्रमांक

दै.रायगड नगरी । उरण

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारडे येथील उपक्रमशील शिक्षक कौशिक ठाकूर यांनी २०२१ -२२ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत माझे अंगण माझी शाळा या नवोपक्रमाला रायगड जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळाला आहे.या अगोदर ही शैक्षणिक गरज २०१९-२० मध्ये शालेय संग्रहालय या उपक्रमाला तिसरा, व २०२०-२१मध्ये तळ्याच्या फांजीवर या उपक्रमाला चौथा क्रमांक होता. सतत तीन वर्ष सर्वोत्तम पाच मध्ये येण्याचा मान मिळविणारे ते रायगड जिल्ह्यातील पहिले शिक्षक ठरले आहेत.

पोलादपूर नगरपंचायतीच्या दुसऱ्या टप्प्याच्या निवडणुकीसाठी उद्यापासून होणार नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात

काही उमेदवार बदलणार आणि तिरंगी-चौरंगी लढती रंगणार

दै.रायगड नगरी । पोलादपूर

नगरपंचायत पोलादपूरच्या १३ सर्वसाधारण प्रभागांच्या निवडणुकीसाठी मतदानप्रक्रिया पूर्ण झाली असताना आता नामाप्र प्रभागांचे आरक्षण सर्वसाधारण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील चार प्रभागांची निवडणुकप्रक्रिया उद्या बुधवार दि. २९ डिसेंबर २०२१ रोजीपासून सुरू होणार आहे. या चार प्रभागांच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये तिरंगी आणि चौरंगी लढती रंगणार असून जागा जिंकण्यासाठी काही उमेदवार बदलण्यात येणार असून यशाची खात्री नसलेल्या १३ प्रभागातील एखाद्या उमेदवाराकडून दुसरी संधी मागितली जाण्याची लक्षणे दिसून येणार आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या १३ प्रभागांमध्ये काँग्रेस विरूध्द शिवसेना अशी प्रमुख पारंपरिक प्रतिस्पर्धी पक्षांची लढत सुरू असताना यंदा काँग्रेस सोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची निवडणूकपूर्व आघाडी झाली असून भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि अखिल भारतीय सेना असे तीन पक्ष स्वतंत्ररित्या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ही राजकीय परिस्थिती उर्वरित २, ८, १० आणि १४ प्रभागांच्या अनारक्षित पदांच्या निवडणुकांदरम्यान कायम राहणार आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या यापुर्वीच्या नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षणाच्या प्रभाग २ मधून शिवसेनेकडून माजी सरपंच मनोज प्रजापती, आणि काँग्रेस राष्ट्रवादी आघाडीकडून कल्पेश मोहिते, प्रभाग ८ मधून सेनेकडून रिमा बुरूणकर तर आघाडीकडून अनिता जांभळेकर, प्रभाग १०मधून सेनेकडून संगिता इंगवले,आघाडीकडून शुभांगी चव्हाण, मनसेच्या प्रज्ञा सुर्वे, प्रभाग १४मधून माजी नगराध्यक्ष निलेश सुतार तर आघाडीकडून प्रकाश भुतकर आणि भाजपाकडून अंकिता जांभळेकर असे उमेदवारी अर्ज दाखल करून झाल्यानंतर छाननीमध्ये हे सर्व अर्ज वैध ठरले. याच उमेदवारांना पुन्हा नव्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्याची संधी मिळणार आहे. मात्र, पक्षाने या उमेदवारांची उमेदवारी कायम ठेवण्याची आवश्यकता आहे.

२१ डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या मतदानप्रक्रियेमध्ये काही उमेदवारांचा निसटता पराभव होण्याची शक्यता असल्याने त्यांनी त्यांच्या पक्षांकडे पुन्हा उमेदवारी मागण्याची तयारी चालविली आहे तर काही इच्छुकांना पहिल्या १३ प्रभागांच्या निवडणुकीमध्ये उमेदवारी न मिळाल्याने त्यांनीदेखील पक्षाकडे उर्वरित चार प्रभागांच्या निवडणुकीमध्ये संधी मागितली आहे. यामुळे चार प्रभागांतील नामाप्र आरक्षणावेळीचे उमेदवार नव्याने जाहिर झालेल्या अनारक्षित प्रभागांमध्ये कायम ठेवले जाण्याची शक्यता दुरावली आहे.

उद्या बुधवार दि. २९ डिसेंबर २०२१ ते ३ जानेवारी २०२२ दरम्यान नामनिर्देशनपत्र थेट अथवा निवडणुक आयोगाने निश्चित केलेल्या संकेतस्थळावर सादर करायचे असून सुटीचे दिवस वगळता सकाळी तहसिल कार्यालयामध्ये थेट स्विकारले जाणार आहेत. दि. ४ जानेवारी २०२२ रोजी छाननी आणि वैध ठरलेल्या अर्जांची यादी सकाळी ११ वाजल्यापासून प्रसिध्द करण्यात येणार आहे. नामनिर्देशनपत्र मागे घेण्यासाठी दि. १० जानेवारी २०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत मुदत असून दि.१८ जानेवारी २०२२ रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदानप्रक्रिया घेण्यात येणार आहे. दि.२१ डिसेंबर २०२१ आणि दि. १८ जानेवारी २०२२ रोजी होणाऱ्या मतदानप्रक्रियेची मतमोजणी बुधवार, दि. १९ जानेवारी २०२२ रोजी सकाळी १० वाजल्यापासून पोलादपूर तहसिल कार्यालयाच्या पहिल्या माळ्यावर होणार असल्याची माहिती यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड आणि सहायक निवडणूक अधिकारी तथा प्रभारी मुख्याधिकारी महादेव रोडगे यांनी दिली.

मारहाण करून खिशातून पंचवीस हजार रुपये काढून केली चोरी

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल बस स्टॉप जवळ उभा असताना २२ वर्षीय तरुणाला मारहाण करून त्याच्या खिशातून पंचवीस हजार पाचशे रुपये जबरीने काढून घेतल्याप्रकरणी चौघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवनाथनगर झोपडपट्टी, पनवेल येथे राहणारा रिक्षाचालक सफीक हुसेन रझा हा पनवेल बस स्टॉपच्या पाठीमागे रस्त्यावर बाथरूम जवळ आला होता. यावेळी त्याच्या ओळखीचे तकदीर, दुधा व इतर दोन जण थांबले होते. यावेळी तकदिर याने त्याला जवळ बोलावून घेतले व पँटच्या खिशात हात घातला.

यावेळी सफिक याने त्याला विरोध केला. तकदीर याने दगडी लादीचा तुकडा त्याच्या डोक्यात मारला व त्याला जखमी केले. यावेळी तकदीर, दुधा व त्यांच्यासोबत असलेल्या दोन मित्रांनी सफिक याच्या खिशातून २५ हजार पाचशे रुपये जबरीने काढून घेऊन ते त्याला जखमी अवस्थेत सोडून पळून गेले. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. चौघांविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मदतीचा हात, सुकर झाली पायवाट

दै.रायगड नगरी । दिघी

दिघी - श्रीवर्धन तालुक्यातील कापोली येथील उत्कर्षनगर मध्ये नव्याने लोकवस्ती तयार होत आहे. मात्र, या वस्तीत जाणारी मोठ्या प्रमाणात दुरावस्थेत असलेली अनेक कुटुंबांची पायवाट आता रामचंद्र मेंदाडकर यांच्या मदतीने सुकर झाली आहे.

कापोली येथील उत्कर्ष नगर येथे आजूबाजूला वीसहुन अधिक कुटुंब स्थायिक आहेत. नव्याने स्थित होत असलेल्या या कुटूंबांना सुरुवातीपासून अनेक सुविधांची गरज भासू लागली. त्यामुळे कोणत्याही शासन निधीच्या प्रती-क्षेत न राहाता लोकसहभागातून मदत मिळवण्यासाठी येथील रहिवासी उदय कळस यांनी पुढाकार घेतला. ऍड. रामचंद्र मेंदाडकर या मित्राच्या मदतीने येथील १५५ मीटरची पायवाट सिमेंट काँक्रीटने तयार करण्यात आली. या सामाजिक उपक्रमाचे

मोठया उत्साहात उदघाटन करण्यात आले.

या रस्त्याचे रजनी माऊली मेंदाडकर नामकरण करण्यात आले. यावेळी दिघी सागरी ठाण्याचे सा. निरीक्षक संदीप पोमन यांच्या हस्ते फलकाचे अनावरण करण्यात आले.

या सोहळ्याला दामोदर दिघीकर, संदिप चव्हाण, दत्तात्रेय पांढरकामे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना तालुका सचिव सुमित सावंत, धवल तवसाळकर, श्रीकांत शेलार, सुरेश पांढरकामे, संतोष रेळेकर, वैभव तोडणकर, संतोष शिलकर, अमोल चांदोरकर, मनोज गोरेकावकर, कृष्णा जाधव, जितेंद्र भायदे स्वप्नाली कळस, आदी मान्यवरांनी उपस्थित राहून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

गोपाळ म्हात्रे महाराष्ट्र प्रतिभा गौरव पुरस्काराने सन्मानित

दै.रायगड नगरी । उरण

इमेज इंटरनॅशनल ऑनलाइन रिसर्च सेंटर व समृद्धी प्रकाशन सिंधुदुर्ग यांच्या वतीने लोकसंवाद प्रतिमा संमेलन यांच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त प्रतिभावंतांचा पुरस्कार सोहळा कोल्हापूर येथे पार पडला.

यामध्ये महाराष्ट्रा मधून काना कोपऱ्यातून कला साहित्य सामाजिक क्रीडा यामध्ये नैपुण्य मिळविलेल्या मान्यवरांना महाराष्ट्र प्रतिभा गौरव पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये गोपाळ दिनकर म्हात्रे सारडे- उरण व रोहित शरद घरत विंधने- उरण यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कार वितरणासाठी प्रसिद्ध अभिनेते माधव अभ्यंकर, जेष्ठ समाजसेवक प्रकाश गायकवाड, पुणे मॅनेजिंग डायरेक्टर अविल ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे निसार सुतार, पंच गण्य तज्ञ-विवेकानंद जितकर, संस्थेचे अध्यक्ष बि. एन खरात आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

खांदा वसाहतीत सार्वजनिक शौचालयांचा अभाव ; मोबाईल टॉयलेट बसवण्याचा प्रस्तावही कागदावरच

नगरसेविका सिताताई पाटील यांनी महासभेत मुद्दा मांडला

दै.रायगड नगरी । पनवेल

खांदा वसाहतीमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह त्याचबरोबर मुताऱ्या नसल्याने स्वच्छ भारत अभियानाला एक प्रकारे खीळ बसत आहे. यासंदर्भात वारंवार मागणी करू नये कार्यवाही होत नाही. हाच मुद्दा ज्येष्ठ नगरसेविका सिताताई सदानंद पाटील यांनी यांनी महासभेमध्ये उपस्थित केला. याबाबत योग्य व त्वरित कार्यवाही करावी अशी मागणी पाटील यांनी सभागृहात केली

खांदा वसाहतीची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्याचबरोबर फेरीवाले आणि इतर विक्रेतेही मोठ्या संख्येने आहेत. रिक्षा चालक आणि बाहेर येणारे ज्येष्ठ नागरिकांची संख्यासुद्धा दखलपात्र आहे. या व्यतिरिक्त वसाहतीत तीन उद्यान आहेत. येथे सुद्धा लहान मुले नागरिकांची ये-जा सुरू असते. या सर्व पार्श्वभूमीवर रहिवाशांना सोय व्हावी म्हणून सार्वजनिक स्वच्छतागृह आणि मोबाइल टॉयलेट बसवण्यात यावेत अशा प्रकारची मागणी स्थानिक नगरसेविका सिताताई पाटील यांनी याअ-गोदरच केली होती. त्यानुसार उद्यानामध्ये टॉयलेट बसवण्याचे नियोजन पनवेल महानगरपालिकेने केले होते. त्यासाठी जागा निश्चित करून सर्व्हे सुद्धा करण्यात आला होता.

मात्र आजतागायत या ठिकाणी टॉयलेट लावण्यात आलेले नाहीत. याबद्दल नगरसेविका पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. त्यामुळे उद्यानात येणाऱ्यांची कुचंबणा होत असून गैरसोयींना सामोरे जावे लागते. स्वच्छ सर्वेक्षण आणि स्वच्छता अभियानांतर्गत या सुविधा उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी अशी महत्त्वपूर्ण फेर मागणी नगरसेविका सिताताई सदानंद पाटील यांनी महासभेत केली.

खांदा वसाहतीमध्ये रेल्वे मार्गालगत झोपडपट्टी वसलेली आहे. संबंधित झोपडपट्टी धारक अनेक वर्षांपासून या परिसरात राहतात. त्यांचे रहिवाशाचे पुरावे आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत त्यांचे सर्वेक्षण सुद्धा झालेले आहे. असे असताना त्यांना शौचालयाची सुविधा स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महापालिका पुरवत नाही. त्या ठिकाणीही मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यासंदर्भात चा मुद्दा सिताताई पाटील यांनी उपस्थित केला.

पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

अ.क्र.	अर्जदाराचे नाव व पत्ता	झाडांचा प्रकार व संख्या	झाडे तोडण्याचे कारण
१	मा.उपविभागीय अधिकारी व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय पनवेल	०१ रेन ट्री	पनवेल महानगरपालिका हद्दीतील मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल कार्यालयाच्या परिसरात झाडे आहेत. इमारतीच्या मागच्या बाजूला एक जंगली झाड आहे. या झाडाची मुळे खोल इमारतीखाली गेली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात कार्यालयाच्या इमारतीमध्ये खालून झरे तयार झाल्यासारखे फरशीतून पाणी येते. तसेच इमारत कमकुवत होवून पडझड होण्याची शक्यता आहे. यामुळे कार्यालयात येणारे अभ्यगत, शेतकरी आणि नागरिकांची गैरसोय होते. तरी ०१ रेन ट्री झाड तोडण्याची परवानगी बाबत.
२	वरिष्ठ अधिक्षक, पोस्ट ऑफिस, नवी मुंबई विभाग, पनवेल.	०१ बदाम	पनवेल महानगरपालिका हद्दीतील बिल्डींग नं.१५, PL ५, सेक्टर १७, नवीन पनवेलच्या आवारातील बदामाचे मोठे झाड हे या वर्षीच्या पावसाळ्यात त्या स्टाफ क्वार्टरच्या इमारतीत कोसळून अडकले आहे. कोसळलेले झाड खाली असलेल्या इलेक्ट्रीक डीपीला हानी पोहोचवू शकते. ज्यामुळे शॉर्ट सर्कीट होवू शकते. सदर झाडामुळे जिवीतहानी व वित्तहानी शक्यता नाकारता येत नाही. तरी ०१ बदामाचे झाड तोडण्याची परवानगीबाबत.

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
सहा आयुक्त
तथा
वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.९२/४९१/२०२१
दिनांक : २७/१२/२०२१

सचिन सावंत यांच्या प्रयत्नामुळे ई रिक्षाच्या सबसिडीला पर्यावरण सचिव यांनी मुदतवाढ दिली

दै.रायगड नगरी । माथेरान

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सचिन सावंत दोन दिवसांपूर्वी माथेरानला आले असता ई रिक्षा सुरू करण्या बाबतच्या अडचणी बाबत सविस्तर चर्चा केली कायदेशीर अडचणींवर मात करीत लवकरच सुरू होणार असल्याचे श्रमिक रिक्षा संघटनेचे सचिव सुनिल शिंदे यांनी सांगितले मात्र राज्य सरकार तर्फे ई रिक्षाला देण्यात आलेली रु ३० हजार रुपयांची सबसिडी देण्यात येते या सबसिडी ची मुदत ३१ डिसेंबर रोजी संपत आहे तरी या सबसिडी ला मुदत वाढ देण्याची मागणी श्रमिक रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, उपाध्यक्ष प्रकाश सुतार यांच्या सहीचे निवेदन सचिन सावंत यांना दिले होते.

पर्यावरण सचिव मनीषा म्हैसकर यांना सबसिडी ला मुदत वाढ देण्या बाबत सचिन सावंत यांनी तात्काळ संपर्क साधला व केंद्र सरकारने त्यांच्या रु ६८ हजार सबसिडीला ३१ मार्च २०२२ पर्यंत मुदत वाढ दिल्याची बाब निदर्शनास आणून दिली. त्यानुसार राज्य सरकारच्या रु.तीस हजारच्या सबसिडीस देखील मुदत वाढ दिली आहे. याचा फायदा महाराष्ट्रातील सर्व ई रिक्षा खरेदी करणाऱ्याना मिळणार आहे. माथेरानच्या श्रमिक रिक्षा संघटने तर्फे सचिन सावंत यांचे धन्यवाद व्यक्त केले आहेत. यावेळी काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे,युवा काँग्रेस अध्यक्ष आदित्य भिलारे,काँग्रेसचे जेष्ठ सदस्य विठ्ठल पवार, मंगेश शिंदे, बिलाल महाबळे यांसह महिला

आघाडीच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या या जडणघडणीत वेळेन-ुसार जुन्या काळातील कार्यपद्धतीला आवर घालून नव्या उगमाकडे मार्गक्रमण केल्यास सर्वांच्या हितावह असणार आहे काळानुसार बदल घडवून आणणे हे प्रत्येकाला अपेक्षित असते त्यातच माथेरान मध्ये लवकरच पर्यटन वाढीसाठी ई रिक्षा सारखी पर्यावरण पूरक साधने उपलब्ध होणार आहेत त्यामुळे निश्चितच हे स्थळ विकासाच्या दिशेने हे पहिलेच पाऊल टाकणार आहे. ज्यांना ज्यांना आपल्या भावी पिढीला नव्या उगमाकडे न्यावयाचे आहे.मुलाबाळांचे भवितव्य उज्वल पहावयाचे आहे आणि आपला परंपरागत असलेला व्यवसाय अंगवळणी पडलेला आहे त्याला तिलांजली देऊन जर या निर्णयाचे स्वागत केले. तर त्यांनाही यामध्ये सामावून घेण्याची शक्यता आहे अन्यथा जे व्यवसायीक साथ देतील त्यांना सोबत घेऊन इथे अल्पावधीतच श्रमिक रिक्षा संघटनेचे सचिव काँग्रेसचे जेष्ठ सदस्य सुनील शिंदे यांच्या मागील दहा वर्षांच्या अथक प्रयत्नांमुळे ई-रिक्षा धावणार आहे यात शंकाच नाही.

संक्षिप्त...

अवैध दारू विक्री प्रकरणी गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

पाले खुर्द गावात अवैध दारू विक्री करणाऱ्या विरोधात तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे. त्याच्याकडून २८ हजार ३८५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पाले खुर्द येथे उंबराच्या झाडाजवळ रस्त्यालगत एक इसम अवैधरित्या दारू विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यावेळी अंधारात रस्त्याच्या लगत हनुमान दिनकर खांडे (वय ४०) हा दारू विक्री करताना सापडून आला. त्याच्याकडून २८ हजार ३८५ रुपयाचे मद्य हस्तगत करण्यात आले आहे.

वाशी येथे राष्ट्रीय ग्राहक दिनी २०२१ संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनाचे निमित्ताने राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व संरक्षण विभाग तसेच वैध मापन शास्त्र यंत्रणा विभाग नवी मुंबई कडून वाशी येथे नागरिकांना ग्राहक हक्कांविषयी तसेच वस्तूंवरील वजन इ. माहिती बाबत प्रबोधन माहिती देऊन जनजागृती उद्देशाने आयोजन वैध मापन शास्त्र यंत्रणा वाशी नवी मुंबई विभागमार्फत करण्यात आले होते.बाजारात विक्रीसाठी असणाऱ्या वस्तूंच्या आ-वरणावर एमआरपी, वजन, उत्पादनाची तारीख,पॅकेर्सवर पूर्ण पत्ता ,ग्राहक, ई - मेल, दूरध्वनी क्रमांक इ. प्रिंट करणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र नागरिक ह्या सूचना तपासून घेत नसल्याने अनेकदा ग्राहकांची फसवणूक होते. शासनाच्या वैधमापन शास्त्र विभाग अशा व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवते. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची व विक्रेत्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, यासाठी दरवर्षी २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी ग्राहकहिताची जनजागृती करणारे कार्यक्रम राबविले जातात. या जनजागृतीचा एक भाग म्हणून वैधमापन शास्त्र विभागाच्या वतीने स्टॉल लावून वजनकांटा, मापे, उत्पादनांवरील माहिती इ. बद्दल प्रात्याक्षिके माहितीसह देण्यात आली. तसेच ग्राहक जनजागृती माहितीपत्रके वाटण्यात आली. यावेळी वैध मापन शास्त्र यंत्रणा विभाग एस.एस.कदम उपनियंत्रक, ठाणे - पालघर जिल्हा यांचे मार्गदर्शनाखाली वाशी - १ विभागाचे निरीक्षक सुहास कुटे आणि वाशी -२ विभागाचे निरीक्षक मधुकर राठोड यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्षेत्र सहा. अनंता कोशिंबे, रमाकांत गाडेकर, यांनी परिश्रम घेतले, यावेळी नागरीकांनी उपस्थित राहून सकारात्मक प्रतिसाद दिला.

अर्धवट कामांमुळे माथेरानमधील रस्त्यांवरून चालणे झाले कठीण

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान मध्ये धुळविरहित रस्ते व्हावेत जेणेकरून पावसाळ्यात होणारी मातीची धूप कमी करण्यासाठी पर्यावरण पूरक क्लेपेव्हर ब्लॉकच्या रस्त्याना मान्यता दिल्यामुळे गावातील अनेक भागात अशाप्रकारे रस्ते बनवण्यासाठी मागील दोन वर्षांपासून सपाटा सुरू आहे. त्यामुळेच सध्यातरी इथे तितकासा घोड्यांच्या लीद मिश्रित धुळीचा प्रादुर्भाव जाणवत नाही. धुळीचे प्रमाण कमी होत आहे. माथेरान मध्ये सर्वत्र लाल मातीचेच रस्ते पूर्वापार आहेत. याकामी पर्यटकांना सहज चालण्यासाठी, त्याचप्रमाणे हातरीक्षा चालकांना अधिक श्रम होऊ नयेत यासाठी हे रस्ते खास आकर्षण ठरत आहेत.

विविध ठिकाणी क्लेपेव्हर ब्लॉक रस्त्यांची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत परंतु ही कामे पूर्ण करताना त्यावर नगरपरिषदेच्या लोकप्रतिनिधींचा अथवा अभियंत्यांचा कोणत्याही प्रकारचा अंकुश राहिलेला नसल्याने होत असलेली कामे खूपच घाईगडबडीने पूर्ण करून बिले काढण्यासाठी ठेकेदारांची लगबग होताना दिसते.या रस्त्यांच्या बाजुला पावसाळी पाणी वाहून जाण्यासाठी जांभ्या दगडात गटारे बनविली जात आहेत त्याठिकाणी सुध्दा आजूबाजूला असलेल्या हॉटेल समोरील जागेवर उंचवटा करून एकप्रकारे त्या त्या हॉटेल धारकांना संरक्षण दिले गेले आहे त्यामुळे हेच हॉटेल धारक काही दिवसांत त्याठिकाणी आपला हक्क बजावणार आहेत यात शंका नाही. ज्या ज्या ठिकाणी हे रस्ते बनविताना लावण्यात येणारे ब्लॉक हे उत्तम दर्जाचे आहेत किंवा नाहीत याबाबत कुणालाही काहीएक स्वारस्य दिसत नाही. येथील हॉटेल प्रीती समोरील अशाच प्रकारच्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी खूपच घाई केलेली दिसत असून त्याभागात ही कामे रात्रीच्या वेळी करण्यात आली आहेत. त्यामुळे पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी ठेकेदारांनी उतार सुध्दा दिलेला नाही त्यामुळे या रस्त्याचे काम एकसंध नसून लावलेले ब्लॉक लवकरच पूर्णपणे सपाट झालेले दिसत आहेत. यावरून वर्दळ असल्याने जागोजागी खड्डे पडलेले आहेत.

बहुतांश कामांची भूमिपूजन आणि उद्घाटनाच्या पाट्या लावल्या नंतर त्या निकृष्ठ कामांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात आहे. तर तेथूनच पेमास्टर पार्क कडे जाणाऱ्या रस्त्यावर ब्लॉक येण्याच्या अगोदरच अनेक महिन्यांपूर्वी त्याठिकाणी खडी अंथरून ठेवली आहे त्यामुळे हातरीक्षा चालकांना, घोडेवाले त्याचप्रमाणे पायी चालत जाणाऱ्या पर्यटकांना, त्या भागातील रहिवाशांना खूपच त्रासदायक बनलेले आहे. दोन वर्षांपूर्वी काही ठिकाणी असे रस्ते बनविताना थोडीशी जरी चूक आढळून आल्यावर स्वतःला इंजिनियर समजणा-या गावातील काही मंडळींनी मोठया प्रमाणावर आकांडतांडव केलेला होता ती मंडळी सद्यस्थितीत होत असणाऱ्या निकृष्ट कामांबाबतीत मूग गिळून का गप्प बसले आहेत की त्यांच्या बेभान सुटलेल्या जिभेवर कुणा ठेकेदारांमार्फत गुळाचा खडा तर ठेवला नाही ना असाही सवाल यानिमित्ताने नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

निदान आगामी काळात आणि यापुढे होणारी कामे चिरकाळ तग धरू शकतील अशाप्रकारे करावीत कारण या छोट्याशा गावाला आणि विशेष करून क वर्ग असणाऱ्या माथेरान नगरपरिषदेला सातत्याने भरीव निधी उपलब्ध होऊ शकत नाही. असे जेष्ठ नागरिकांमधून बोलले जात आहे.

उरणमध्ये वाढता कोरोना आणि होणारी गर्दी टाळण्यासाठी कडक निर्बंध

दै.रायगड नगरी । उरण

संपूर्ण जगाची डोकेदुखी वाढवणाऱ्या कोरोना विषाणूच्या ओमायक्रॉन या नव्या व्हेरियंटच्या मदतीने पुन्हा डोकं वर काढण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे प्रशासनाने निर्बंध पुन्हा कडक करण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर उरण तालुका प्रशासनही सज्ज झाले आहे. उरण तालुक्यात कुठेही फिरताना मास्क वापरावे आणि गर्दीचे कार्यक्रम टाळण्याचे आवाहन उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी केले आहे.

वर्ष अखेर आणि लग्नसराई ची सध्या धामधुम सूरू आहे. त्यामुळे कार्यक्रमांत मोठ्या प्रमाणे गर्दी होत आहे. या गर्दीमुळे कोरोना पसरण्याची शक्यता असल्याने नागरीकांनी फिरताना मास्क वा-परावा, सर्वांनी कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेणे बंधनकारक असून त्यासाठी १० ठिकाणी लसींची उपलब्धता करून देण्यात आली आहे.

रात्री ९ ते सकाळी ६ वा. दरम्यान गर्दीचे कार्यक्रम टाळावे, पाच किंवा अधिक व्यक्ती एकत्र आढळल्यास त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्याच्या सुचना पोलिसांना देण्यात आल्याआहेत. लग्न समारंभ रात्री ९ नंतर टाळावेत. ग्रामपंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी केले आहे.

सहाव्या वेतन आयोगानुसार चौथ्या व पाचव्या हप्त्यापोटी देय असलेली रक्कम मिळण्यासाठी

खोपोली सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण

दै.रायगड नगरी । खोपोली

दि. ३० जून २०१६ पर्यंत नगरपरिषद सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार चौथ्या व पाचव्या हप्त्या पोटी देय असलेली रक्कम खोपोली नगरपरिषदेने कपात करून ठेवलेली देय रक्कम देण्यात यावी, दि. १ जानेवारी २०१६ ते दि. ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत नगरपरिषद सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना या पूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तीवेतनावर उपदान (ग्रेच्युटी), शिल्लक रजारोखीकरण, पेन्शन विक्रीची रक्कम लाभ घेतलेल्या निवृत्ती वेतन धारकांना सातव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्ती वेतनावर आधारीत फरकाच्या रकमेचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी यशवंत गुरव, ए.एन. खोत, डी.टी. धुमाळ, अन्वर गाझी, ए. एस. चव्हाण, एम. जी. कुंभार, रहेमान करजीकर, व्ही. के. पाटील, ए. आय. करजीकर, डी. पी. पाटील, बी. एन. रोकडे आदी कर्मचारी उपोषणाला बसले आहेत.

जेष्ठ व सेवा निवृत्त कर्मचारी भर थंडीत उपोषणाला बसले आहेत. अनेक महिन्यांपासूनची मागणी असताना कर्मचाऱ्यांना फक्त आश्वासन मिळाले आहे. त्यामुळे संतापलेल्या कर्मचाऱ्यांनी उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

नेरळ कॉलेजची नीता राठोड रग्बीच्या महाराष्ट्र संघात

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत तालुक्यातील नेरळ येथे असलेल्या विद्या मंदिर मंडळाच्या मातोश्री सुमती चिंतामण टिपणीस कला- महाविद्यालयात नीता राठोड या विद्यार्थिनीने महाराष्ट्र राज्याच्या रग्बी संघात स्थान मिळविले आहे. राष्ट्रीय रग्बी चॅम्पियनशिप साठी नीता राठोड ची निवड झाली असून उडीसा राज्यात हि राष्ट्रीय स्पर्धा झाली त्यात महाराष्ट्र राज्याच्या संघ उपविजेता ठरला आहे.

नेरळ ममदापुर येथील मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस कला व वाणिज्य महाविद्यालयमध्ये कला शेहत पहिल्या वर्षात शिकणाऱ्या नीता राठोड हि येथील क्रीडा क्षेत्रातील तुटपुंज्या सोयीसुविधा वर मात करीत तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेत होती. त्यातून स्वतः मेहनत घेऊन नीता राठोड या क्रीडापटू विद्यार्थिनीने आपल्या खेळाच्या जोरावर महाराष्ट्र रग्बी असोसिएशनची मने जिंकली आणि महाराष्ट्र राज्यातून राष्ट्रीय पातळीवर रग्बी या संघात निवड झाली आहे. भुवनेश्वर उडीसा येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील रग्बी चॅम्पियनशिप स्पर्धेत सांघिक प्रकारात रौप्यपदक प्राप्त मिळवले. राष्ट्रीय रग्बी स्पर्धेत महाराष्ट्र संघाच्या उपविजेते पदाच्या वाटचालीत नीता राठोड या खेळाडूचा मोठा सहभाग राहिला आहे.

मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला.तिच्या या यशात महाविद्यालयाचे स्पोर्ट इन्चार्ज प्रा. दुर्राझ टीवाले. आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. केशव पवार यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. या यशाबद्दल तीच सत्कार कर्णयुगात आला, त्यावेळी विद्या मंदिर मंडळाचे कोषाध्यक्ष विवेक पोतदार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकुमार इंगळे आणि पालक तसेच प्राध्यपक वर्ग उपस्थित होता.

ओमायक्रॉनचा वाढता प्रादूर्भाव ; सुधारित आदेश जारी

दै.रायगड नगरी । अलिबाग

करोना विषाणूचा ओमायक्रॉन प्रकार आता जगभरात गेल्या काही दिवसांमध्ये सर्वात वेगाने पसरणारा प्रकार म्हणून समोर आला आहे. हे यू.एस.ए आणि युरोपमधील अनेक देशांमध्ये प्रबळ प्रकार बनले आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात आधीच एकूण ८८ ओमायक्रॉन कोविड-१९ प्रकरणे नोंदली गेली आहेत. गेल्या आठवड्यात राज्यात कोविड-१९ ची प्रकरणेही वाढू लागली आहेत. गेल्या दोन महिन्यांत प्रथमच राज्यात दररोज १ हजार हून अधिक पॉझिटिव्ह केसेसची नोंद होत आहे. आगामी काळात नाताळ सण, लग्नसराई, इतर सण आणि नवीन वर्ष साजरे करण्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मोठ्या संख्येने लोक एकत्र येण्याची शक्यता आहे.

या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा-तील कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आणखी काही निर्बंध लादणे अत्यावश्यक आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी साथरोग अधिनियम, १८९७ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये प्राप्त अधिकारातून रायगड जिल्ह्याच्या हद्दीत दि.२५ डिसेंबर २०२१ रोजीच्या रात्री १२ वाजल्यापासून खालील अतिरिक्त निर्बंध पुढील आदेश होईपर्यंत लागू करीत आहे.

नाताळ सण हा शासन गृह विभागाकडील दि.२३ डिसेंबर २०२१ रोजीच्या परिपत्रकातील निर्देशानुसार साजरा केला जाईल, लग्न समारंभासाठी बंदिस्त सभागृहांमध्ये एकावेळी उपस्थितांची संख्या १०० च्या वर नसेल आणि खुल्या जागेत ही संख्या २५० किंवा या जागेच्या क्षमतेच्या २५% यापकी जे कमी असेल त्यास परवानगी असेल, इतर सामाजिक, राजकीय किंवा धार्मीक कार्यक्रम आणि मेळाव्यांच्याबाबतीत जेथे उपस्थितांची संख्या बंदिस्त जागांसाठी १०० च्या वर नसेल आणि खुल्या जागेसाठी (Open Sky) ही संख्या २५० किंवा त्या जागेच्या क्षमतेच्या २५% या पैकी जे कमी असेल त्यास परवानगी असेल, वरील दोन्ही श्रेणींमध्ये समाविष्ट नसलेल्या इतर कार्यक्रमांच्या बाबतीत बंद जागांसाठी उपस्थितांची संख्या परवाना देणाऱ्या प्राधिकाऱ्याने घोषित केलेल्या क्षमतेच्या ५०% पेक्षा जास्त नसेल, तसेच जिथे आसन क्षमता निश्चित नाही अशा खुल्या जागांसाठी एकूण क्षमतेच्या २५% उपस्थितीस परवानगी असेल, क्रीडा स्पर्धा / खेळांच्या बाबतीत कार्यक्रमस्थळाच्या ठिकाणी आसन क्षमतेच्या २५% पेक्षा जास्त उपस्थितीस परवानगी नसेल.

वरील पैकी कोणत्याही प्रकारात न मोडणाऱ्या संमेलने, मेळावे इ. कार्यक्रमाच्याबाबतीत शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील दि.२७ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या आदेशामधील तरतुदीनुसार बंद सभागृहात १०० पेक्षा जास्त नाही व खुल्या मैदानात २५० अथवा २५% या पैकी जे कमी असेल तेवढी संख्या अनुज्ञेय राहील.

तसेच उपहारगृहे, शाळा, स्पा, सिनेमागृहे आणि नाटयगृहे ही परवाना देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने घोषित केलेल्या आसन क्षमतेच्या ५०% कार्यरत राहतील. उपहारगृह मालकांना अशा आस्थापनांच्या परवाना देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेली पूर्ण आसनक्षमता व ५०% अनुज्ञेय आसनक्षमता ठळकपणे घोषित करावी. संपूर्ण जिल्ह्यात सर्व सार्वजनिक ठिकाणी ५ पेक्षा जास्त व्यक्तींच्या एकत्र येण्यावर रात्री ९.०० ते सकाळी ६.०० यावेळेत बंदी असेल.

हे सर्व अतिरिक्त निर्बंध शासन, महसूल व वन आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील दि.२७ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या निर्बंधासह लागू राहतील आणि हे आदेश दि.२५ डिसेंबर २०२१ रोजीचे रात्री १२.०० वाजल्यापासून लागू राहतील. तसेच या आदेशातील नमूद बाबींचे उल्लघंन करणारी व्यक्ती/आस्थापना दंडात्मक कारवाईस तसेच भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, २६९, २७०, २७१ तसेच आपत्ती व्यवस्थापन कलम ५१ सह अन्य तरतूदीनुसार फौजदारी शिक्षेस पात्र राहील, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी कळविले आहे.

शे.का.प. तर्फे खांदा कॉलनी आणि कामोठे येथे स्वच्छता मोहीम

जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचा पुढाकार

दै.रायगड नगरी । पनवेल

आ.बाळाराम पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज खांदा कॉलनी सेक्टर १२ येथील सिडकोतर्फे आरक्षित प्लॉट स्वच्छ करून देण्यात आला सदर प्लॉटवर साचलेले डेब्रिज आणि वाढलेली झाडी झुडपे साफ करून लहान मुले आणि तरुणांसाठी खेळाचे मैदान करून देण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे नियोजन शे.का.प. खांदा कॉलनी कार्याध्यक्ष योगेश कोठेकर यांनी केले होते. याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, शेकाप खांदा कॉलनी अध्यक्ष अनिल बंडगर, माजी नगरसेवक शिवाजीराव थोरवे, शे.का.प उपाध्यक्ष किरण घरत, पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष वैभव गलांडे, शे.का.प. युवा नेते मंगेश अपराज आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना शे.का.प. अध्यक्ष खांदा कॉलनी अनिल बंडगर म्हणाले की यापुढेही आम्ही खांदा कॉलनी मधील आवश्यक ते सिडकोचे मैदानासाठीचे आरक्षित प्लॉट नागरिकांच्या मागणीनुसार शेकाप आणि विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून स्वच्छ करून देणार आहोत याचा शुभारंभ आमदार बाळाराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त केलेला आहे.

कामोठे मधील शे.का.प. नेते व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सुरेश खरात आणि शे.का.प. शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांच्या नियोजनाखाली कामोठे मध्ये स्वच्छता मोहीम घेण्यात आली. त्या मोहिमेत सिडकोचे रिकामी प्लॉट नागरिकांच्या मागणीनुसार स्वच्छ करून देण्यात आले जेणेकरून त्या प्लॉटवर साचलेली घाण आणि वाढलेले झाडे-झुडपे साफ झाल्यामुळे मच्छरांचा त्रास यापुढे नागरिकांना होणार नाही त्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि महिला वर्गातून आभार मानण्यात आले.

B. K. PATIL INSTITUTE OF PHARMACY
Add : Plot No.29, Sector-11, Taloja,
Navi Mumbai. 410 208
Institute DTE code - 3508
Website: www.bkpiop.in
(Affiliated to MSBTE and University Of Mumbai, Approved by AICTE, DTE, Govt. of Maharashtra, PCI U/S 12 of Pharmacy Act 1948)
Admission open (2021- 2022)
B. Pharmacy
Institute level round for B.Pharmacy 1st year is scheduled from Thursday 23/12/21 at 11.am for seats remaining vacant at the end of CAP round.
Vacancy position, eligibility criteria and detailed scheduled will be displayed on college notice board and website www.bkpiop.in
Application form fees – Rs.500/-
Principal
B.K.Patil Institute Of Pharmacy